
फुलनगरी पु.पा.१.

# उत्तन कचरा व दुर्गंधीमुक्त होणार

## ▌कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी पालिकेकडून ठेकेदाराला कार्यादेश



**।मीरा रोड :** भाईंदर पश्चिमेला असलेल्या घनकचरा प्रकल्पात गेल्या काही वर्षांपासून कचरा पडून राहिल्यामुळे दुर्गंधी पसरत होती व त्या कचऱ्याला अनेक वेळा आग लागण्याच्या घटना घडत आहेत. त्यामुळे या कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी महापालिकेकडून ठेकेदाराला कार्यादेश देण्यात आला असून कचरा बायोमायनिंग करण्याचे काम सुरू झाले आहे. त्यामुळे रहिवाशांना कचऱ्याची व त्यापासून येत असलेल्या दुर्गंधीची समस्या दूर होणार आहे.

मीरा-भाईंदर शहरात उत्तन येथे घनकचरा प्रकल्प आहे. या प्रकल्पात दैनंदिन जवळपास ५०० टन कचरा जमा होतो. आता या कचऱ्यावर प्रक्रिया केल्यामुळे कचरा साचून राहत नाही. उत्तन डम्पिंग ग्राऊंडवर वर्षानुवर्षे साचलेल्या कचऱ्याची 'बायो मायनिंग' पद्धतीने विल्हेवाट लावण्याचा निर्णय मीरा-भाईंदर महापालिकेने घेतला आहे. काही वर्षांपासून येथे मोठ्या प्रमाणात कचरा साचून राहिला आहे. या साचून राहिलेल्या कचऱ्याची बायो मायनिंग पद्धतीने विल्हेवाट लावण्यासाठी महापालिकेने निविदा प्रसिद्ध केली होती. त्याचा ठेकेदाराला कार्यादेश देण्यात आला असून हे काम आता वेगाने सुरू झाले आहे. घनकचरा प्रकल्पात शिल्लक असलेल्या घनकचऱ्याचे कॉलेज ऑफ इंजिनीयरिंग पुणे यांच्याकडून मोजमाप प्रमाणित करून घेण्यात आले आहे. जवळपास ९ लाख क्युबिक मेट्रिक टन घनकचऱ्याची बायो मायनिंग पद्धतीने विल्हेवाट लावण्यास शासनाने मान्यता दिली असून या कामासाठी नवीन दरानुसार जवळपास ५२ कोटी खर्च अपेक्षित आहे. या रकमेस प्रशासकीय मान्यता शासनाद्वारे देण्यात आली आहे. केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत मिशन अंतर्गत ५२ कोटी निधी मिळाला आहे. उत्तन येथील घनकचरा प्रकल्पात ९ लाख क्युबिक मेट्रिक टन शिल्लक असलेल्या घनकचऱ्याची बायोमायनिंग पद्धतीने विल्हेवाट लावण्याची मुदत १२ महिने (पावसाळा वगळून) देण्यात आली आहे. कंत्राटदार मे. ई.बी. एन्व्हायरो बायोटेक प्रा. लि. यांच्यातर्फे या बायोमायनिंग कामास सुरुवात करण्यात आली असून पावसाळा सुरू होण्यापूर्वी हे काम संपवण्यासाठी आयुक्तांनी कंत्राटदाराला सांगितले आहे. या प्रकल्पात दिवसाला साधारण ४ ते ५ हजार मेट्रिक टन कचऱ्यावर प्रक्रिया केली जाणार आहे. बायोमायनिंगमध्ये कचऱ्यापासून खत, प्लास्टिक वेगळे केले जाणार आहे. हा प्रकल्प २४ तास सुरू ठेवण्यास महापालिकेने मान्यता दिली आहे. त्यामुळे लवकरात लवकर साचलेल्या कचऱ्यावर प्रक्रिया करून नागरिकांना होणाऱ्या त्रासातून सुटका मिळावी यासाठी महापालिका प्रयत्नशील आहे. बायोमायनिंग म्हणजे वर्षानुवर्षे साचून राहिलेला कचरा चाळणी करून त्यातील खत वेगळे करणे आणि प्लास्टिक व इतर वस्तू वेगळ्या करून त्या प्रक्रियेसाठी पाठविल्या जातात, त्यातील न कुजणारे ज्वलनशील पदार्थ आरडीएफ या स्वरूपात जवळपासच्या सिमेंट फॅक्टरीमध्ये इंधन म्हणून वापरले जाते. पावसाळ्यापूर्वी हे काम पूर्ण झाले तर उत्तन येथील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

# पोलीस शिपाई चालक उमेदवारांसाठी रविवारी लेखी परीक्षा



**।मीरा रोड :** मीरा-भाईंदर-वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या वतीने पोलीस भरती प्रक्रिया २०२१ करता पात्र पोलीस शिपाई चालक उमेदवारांसाठी लेखी परीक्षेचे आयोजन करण्यात आले आहे. मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या आस्थापनेवर सुरू असलेल्या पोलीस शिपाई-चालक पदाच्या भरती प्रक्रियेमध्ये शारीरिक चाचणी व कौशल्य चाचणीमधून लेखी परीक्षेसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी यापूर्वी प्रसिद्ध करण्यात आली आहे. या उमेदवारांची लेखी परीक्षा २६ मार्च २०२३ रोजी सकाळी ८.३० ते १० या वेळेत मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्त कार्यालय, दुसरा माळा, संवाद हॉल, राष्ट्रसंत आचार्य पद्मसागर सुरश्वर भवन, सेक्टर ५, मीरा रोड पूर्व या ठिकाणी घेण्यात येणार आहे. लेखी परीक्षेसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांना लेखी परीक्षेचे प्रवेशपत्र हे महाआयटी विभागामार्फत ऑनलाइन पद्धतीने उपलब्ध आहे. सर्व पोलीस शिपाई चालक लेखी परीक्षेसाठी पात्र असलेल्या उमेदवारांनी रविवार, २६ मार्च २०२३ रोजी सकाळी साडेसहा वाजता त्या ठिकाणी हजर रहावे. तसेच दिलेल्या अटीशर्तींचे पालन करण्यात यावे, असे पोलिसांनी आवाहन केले आहे. ही पोलीस शिपाई चालक भरती लेखी परीक्षा पारदर्शकपणे पार पाडण्यासाठी सर्व स्तरावर विशेष उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत.

Scanned with CamScanner

म-टा. पा.नं.१.

# 'त्या' दर्ग्यावरून इशाऱ्याचा 'भोंगा'

## कारवाई करा; अन्यथा गणपती मंदिर उभारण्याचा राज यांचा इशारा

- माहीमच्या समुद्रात बेकायदा दर्गा उभारण्यात येत असल्याकडे राज ठाकरे यांनी चित्रफितीद्वारे वेधले लक्ष
- भाषणात भाजप, केंद्र सरकारवर प्रहार न करता उद्धव ठाकरे, एकनाथ शिंदे लक्ष्य
- मशिदीवरील भोंगे बंद करण्याची पुन्हा एकदा मागणी





म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई

'राज्यातील राजकीय अस्थिरता आणि प्रशासनाच्या दुर्लक्षाचा फायदा उठवित धर्मांध शक्ती माहीम येथील समुद्रात दुसरा हाजिअली दर्गा उभारत आहेत. यावर सरकारने महिनाभरात कारवाई केली नाही, तर या दर्ग्याच्या बाजूलाच गणपतीचे मंदिर उभारले जाईल. त्यातून जे काही घडेल ते घडू दे. आम्हाला पर्वा नाही,' असा इशारा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी बुधवारी शिंदे-फडणवीस सरकारला दिला. 'मुख्यमंत्र्यांनी राज्याकडे लक्ष द्यावे. उद्धव ठाकरे यांच्या मागे फिरू नये,' असा टोलाही त्यांनी यावेळी हाणला.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा गुढी पाडवा मेळावा बुधवारी मोठ्या जल्लोषात छत्रपती शिवाजी महाराज मैदानावर साजरा झाला. यावेळी उपस्थित जनसमुयाला मार्गदर्शन करताना राज ठाकरे यांनी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यावर जोरदार टीकेचा आसूड ओढतानाच, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनाही सूचक इशारा दिला. 'आजवर छत्रपती शिवाजी महाराजांनी सूरत लुटल्याचे ऐकत होतो. पण, महाराष्ट्र लुटून अलिबाबा आणि ४० जण सूरतला गेल्याचे प्रथमच घडत आहे,' असा टोला राज यांनी हाणला.

➤ जे पेरले, तेच उगवले...५

### विधानसभेच्या निवडणुका घ्या!

'राज्यात अवकाळी पावसामुळे शेतकरी उद्धवस्त होत असून, बेरोजगारी वाढत आहे. उद्योग येताना दिसत नाहीत. सर्व लोक सरकारकडे डोळे लावून बसले आहेत. जनता सरकारवर अवलंबून आहे, पण सरकार मात्र न्यायालयावर अवलंबून असून, न्यायालयाकडे पाहात बसण्यापेक्षा सरळ राज्यात विधानसभेच्या मध्यावर्ती निवडणुका घ्या. एकदा काय तो सोक्षमोक्ष लावून टाका. तुम्ही जो चिखल करून ठेवला आहे. तो जनता तुमच्या तोंडात घालेल,' असा टोला त्यांनी लगावला.

Scanned with CamScanner

म·टा· ५-४·१०



# मराठमोळ्या संस्कृतीचे दर्शन

## वसई-विरारमध्ये गुढीपाडव्यानिमित्त नववर्ष शोभायात्रांचा उत्साह

**म. टा. वृत्तसेवा, वसई**

वसई- विरारमध्ये गुढीपाडव्याचा सण पारंपरिक पद्धतीने साजरा करण्यात आला. ठिकठिकाणी शोभायात्रा काढून मराठी परंपरा, संस्कृती आणि प्रतीकांचे दर्शन घडवले. या निमित्ताने बाइक रॅली तसेच सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजनही करण्यात आले होते. वसईकरांनी नऊवारी साड्या, फेटे, सदरे अशा पारंपरिक पेहरावात या कार्यक्रमांना आपली हजेरी लावून सणाच्या उत्साहात रंग भरले. ढोलताशांच्या गजरात गुढीचे पूजन करून गुढी उभारण्यात आली.

वसईतील नववर्ष स्वागत यात्रा समितीतर्फे दत्त मंदिर ते पारनाका या मार्गावर स्वागतयात्रा काढण्यात आली. यावेळी सर्व वयोगटांतील वसईकरांनी पारंपरिक पेहरावांत यात्रेत सहभाग नोंदवला. छत्रपती शिवाजी महाराज, चिमाजी अप्पा, ताराराणी अशा ऐतिहासिक वेशभूषा साकारून या महान व्यक्तिमत्त्वांना वंदन करण्यात आले. साईबाबा, अन्य देवदेवतांचे देखावेही लक्षणीय ठरले. रुद्रतांडव ढोलताशा पथकाने आपल्या वादनाने गुढीला मानवंदना दिली आणि वसईकरांचीही मने जिंकली. प्रारंभी, रमेदी येथील दत्त मंदिरात गुढीचे पूजन करून या गुढीसोबत शोभायात्रा सुरू झाली. मोठ्या उत्साहात पारनाका येथील शंकराच्या मंदिराजवळ यात्रा समाप्त करून त्या ठिकाणी गुढी उभारण्यात आली.

वसई तालुक्यातील सर्वांत मोठी नववर्ष स्वागतयात्रा नालासोपाऱ्यात निघाली होती. या शोभायात्रेत यंदा रामायणावर आधारित देखावे सादर करण्यात आले होते. ही शोभायात्रा आचोळे तलाव, सेंट्रल पार्क आणि नालासोपारा पश्चिम येथून सुरू होऊन राधानगर येथे तिची उत्साहात सांगता झाली.





सचिन हळदे



### ढोलताशांचा गजर... बाइक रॅली

विरारमधील विठ्ठल मंदिरातर्फे ढोलताशांच्या गजरात शोभायात्रा काढण्यात आली. वसईतील साईनगर परिसरातही शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले होते. 'आमची वसई' संस्थेतर्फे वसई किल्ल्यात गुढी उभारण्यात आली. या निमित्ताने बाइक रॅली, शोभायात्रा आणि सांस्कृतिक कार्यक्रम पार पडले. लेझीम तसेच ढोलताशांच्या गजरात आणि पारंपरिक पेहरावात वसई-विरारवासी यात्रेत सहभागी झाले. घरोघरी गोडाधोडाचे जेवण करून गुढीपाडव्याचा सण साजरा करण्यात आला.

## मिरा-भाईंदरमध्येही स्वागताचा जल्लोष

**म. टा. वृत्तसेवा, मिरा-भाईंदर**

नववर्षाचा पहिला दिवस आणि साडेतीन शुभमुहूर्तांपैकी एक असलेला गुढीपाडवा मिरा-भाईंदरमध्ये मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. शहरातील राजकीय पदाधिकारी व विविध संघटनांतर्फे मराठमोळ्या संस्कृतीचे दर्शन घडवणाऱ्या मिरवणुका आयोजित करण्यात आल्या होत्या. अनेक ठिकाणी सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजनही करण्यात आले.

भाईंदर पश्चिमेला हिंदू नववर्ष स्वागतयात्रा समितीकडून दरवर्षीप्रमाणे मोठ्या उत्साहात स्वागतयात्रा काढण्यात आली. साठ फूट रोड ते ठाकूर गल्लीतील गणेश मंदिरापर्यंत काढलेल्या या यात्रेत मोठ्या प्रमाणावर स्थानिक सहभागी झाले होते. मिरा रोडमध्ये आमदार प्रताप सरनाईक यांच्यामार्फत आयोजित चैत्र नवरात्रोत्सवानिमित्त देवीची प्रतिष्ठापना व शोभायात्रा काढण्यात आली. येथील श्री शाश्वत सोसायटीनेही सकाळी परिसरात शोभायात्रा काढली होती.



घोडबंदर गावात गुढीपाडव्यानिमित्त स्थानिकांनी पारंपरिक पेहरावात शोभायात्रा काढत नववर्षाचे स्वागत केले. मिरा रोडच्या पूनमसागर येथून भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी सायंकाळी शोभायात्रा काढली. पेणकर पाडा येथील मराठा मित्र मंडळाने परिसरात पालखी मिरवणूक काढून गुढीपाडवा साजरा केला. यात महिलांचा सहभाग लक्षणीय होता.

गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर इलेक्ट्रिक वस्तू व सोनेखरेदीसाठी दुकानांमध्ये वर्दळ होती. मिठाईच्या खरेदीसाठीही सकाळपासूनच दुकानांमध्ये गर्दी झाली होती.

Scanned with CamScanner

सकाळ पु. पा. ३.

# दफनभूमीविरोधात स्थानिक आक्रमक

## पेणकर पाडा येथील प्रकल्प दुसरीकडे नेण्याची रहिवाशांची मागणी

भाईंदर, ता.२२ (बातमीदार) : काशी मिरा येथील पेणकर पाडा येथे असलेले दफनभूमीचे आरक्षण विकसित करण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे. त्याला स्थानिकांकडून तीव्र विरोध करण्यात येत आहे. महापालिकेने दफनभूमीचे काम सुरु केल्यास कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न उपस्थित होण्याची शक्यता आहे. त्यामुळे पेणकरपाडा येथील दफनभूमीचे आरक्षण रद्द करण्यात यावे व अन्य ठिकाणी ते विकसित करण्यात यावे अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.



मिरा-भाईंदरच्या १९९७ साली प्रसिद्ध झालेल्या पहिल्या विकास आराखड्यात पेणकर पाडा येथे दफनभूमीचे आरक्षण ठेवण्यात आले आहे. या दफनभूमीच्या आरक्षणावरून पेणकर पाडा ग्रामस्थांमध्ये मोठ्या प्रमाणावर असंतोष आहे. दरम्यान शहरातील मुस्लीम समाजाची लोकसंख्या वाढत असल्यामुळे सध्याच्या दफनभूमी कमी पडत असून आणखी दफनभूमी उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी मुस्लीम समाजाकडून सातत्याने होत आहे. त्यामुळे सुमारे एक वर्षापूर्वी मिरा-भाईंदर पालिकेने पेणकर पाडा येथील दफनभूमीचे आरक्षण विकसित करण्यास सुरुवात केली. त्या वेळी स्थानिक व महापालिका अधिकारी यांच्यात संघर्ष झाला. त्यावेळी काही ग्रामस्थांवर गुन्हेही दाखल झाले. त्यानंतर महापालिकेने काम थांबवले होते.

मात्र काही दिवसांपूर्वीच दफनभूमीच्या मागणीसाठी पुन्हा आंदोलन झाल्याने महापालिकेने पुन्हा एकदा ही दफनभूमी विकसित करण्यासाठी हालचाली सुरु केल्या आहेत. या पार्श्वभूमीवर पेणकर पाड्यातील ग्रामस्थांनीही आक्रमक भूमिका घेतली आहे. स्थानिकांच्या शिष्टमंडळाने याविषयावर मंगळवारी आयुक्त दिलीप ढोले यांची भेट घेऊन त्यांना निवेदन दिले. याठिकाणी मुस्लीम समाजाची वस्ती नाही. स्थानिकांचा दफनभूमीला होत असलेला विरोध व इतर बाबींचा गांभीर्याने विचार करून दफनभूमीचे आरक्षण रद्द करण्यात यावे. नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या शहराच्या प्रारूप विकास आराखड्यात दफनभुमीचे आरक्षण पुन्हा दर्शविण्यात आल्याने त्या विरोधात स्थानिकांनी शेकडो हरकती नोंदवल्या आहेत. असे असताना दफनभूमीचे काम सुरु झाले तर कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे.

### 'आरक्षण रद्द करा'

रहिवाशांना नाइलाजास्तव रस्त्यावर उतरून आंदोलन व बेमुदत उपोषण करावे लागेल. काशी गाव व उत्तन याठिकाणी दफनभूमी विकसित करण्याचा निर्णय याआधी महापालिकेने घेतला आहे. त्यामुळे पेणकर पाडा येथील दफनभुमीचे आरक्षण रद्द करून काशी व उत्तन याठिकाणी दफनभूमी लवकरात लवकर विकसित करण्यात यावी अशी मागणी या निवेदनात करण्यात आली आहे.

### पोलिस बंदोबस्ताची मागणी

दफनभूमीचे आरक्षण असलेली जागा महापालिकेच्या ताब्यात आहे. दफनभूमीची मुस्लीम समाजाकडून मागणी होत असल्यामुळे ते विकसित करण्यासाठी पोलिस बंदोबस्ताची मागणी करण्यात आली आहे. हा बंदोबस्त उपलब्ध झाला की दफनभूमीचे काम सुरु केले जाईल, असे महापालिका आयुक्त दिलीप ढोले यांनी ग्रामस्थांच्या शिष्टमंडळासमोर स्पष्ट केले.

Scanned with CamScanner

लोकमत पा.नं. ३

# लहान मुलांना कामास जुंपणाऱ्यांवर गुन्हा

## अनैतिक मानवी वाहतूक शाखेची कारवाई

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : भाईंदर पूर्वेच्या औद्योगिक वसाहतीतील दोन कारखान्यांत लहान मुलांना धोकादायक कामांना जुंपल्याप्रकरणी अनैतिक मानवी वाहतूक भाईंदर शाखेने दोघा मालकांवर गुन्हा दाखल करून मुलांची सुटका केली आहे.

मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलिस आयुक्तालयाच्या अनैतिक मानवी वाहतूक भाईंदर शाखेचे पोलिस निरीक्षक समीर अहिरराव यांच्यासह उमेश पाटील, रामचंद्र पाटील, केशव शिंदे, अश्विनी भिलारे, सम्राट गावडे, अपर्णा गायकवाड यांच्या पथकाने मंगळवारी भाईंदर पूर्वेच्या मिलन हॉलमागील भाईंदर उद्योगनगर औद्योगिक वसाहतीत छापेमारी केली. बी. के. प्लास्टिक कंपनीत मालक बैतुल्ला खान याने १६ वर्षीय मुलास प्रेस कटिंग मशीनवर कामास जुंपले होते, तर शेजारच्याच गाळ्यातील प्रिन्स मेटल कंपनीत पोलिसांना १७ वर्षीय मुलगा प्रेस मशीनवर काम करताना आढळून आला. या कंपनीचा मालक नथुराम पुरोहित असल्याचे निष्पन्न झाले.

### राबवून घेतले

अल्पवयीन मुलांना कमी पगारात राबवता येत असल्याने त्यांना कामावर ठेवल्याचे मालकाने पोलिसांकडे कबूल केले. अल्पवयीन मुलांना मानसिक व शारीरिक त्रासाच्या धोकादायक कामास जुंपून जीवितास धोका निर्माण केला म्हणून मंगळवारी, २१ मार्चला अश्विनी भिलारे यांच्या फिर्यादीवरून नवघर पोलिस ठाण्यात बैतुल्ला खान व नथुराम पुरोहित या दोघांवर सुधारित कायदा अधिनियमाप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

लोकसत्ता ५-४-२.

# गहाळ दागिने दोन तासांत परत

वसई : एका महिलेचे गहाळ झालेले पाच तोळ्यांचे दागिने नायगाव पोलिसांनी अवघ्या दोन तासांत शोधून दिले आहेत. पोलिसांच्या या तत्परतेमुळे हवालदील झालेल्या दाम्पत्याला मोठा दिलासा मिळाला आहे.

नायगावच्या साईधाम कॉम्प्लेक्समध्ये राहणारे मोहन चाळके हे पत्नी मनीषासह सकाळी ११ च्या सुमारास नायगाव रेल्वे स्थानकातून दुचाकीने जात होते. याच वेळी प्रवासादरम्यान मनीषा यांची पर्स गहाळ झाली. या पर्समध्ये पाच तोळे सोन्याचे दागिने व दोन मोबाइल होते. चाळके दाम्पत्याने लगेच नायगाव पोलीस ठाण्यात धाव घेतली. गुन्हे प्रकटीकरण शाखेचे साहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष सांगवीकर यांच्या पथकाने शोध सुरू केला. ते ज्या मार्गावरून निघाले होते त्याचा मागोवा घेऊन सीसीटीव्ही चित्रण तपासले. या तपासादरम्यान रस्त्यात काम करणाऱ्या कामगारांकडे चौकशी केली. त्यातील एका कामगाराकडे ही बॅग आढळली. ती ताब्यात घेऊन चाळके दाम्पत्याला परत करण्यात आली. अवघ्या दोन तासांत पोलिसांनी हे गहाळ झालेले दागिने परत मिळवून दिले.

लोकमत ५-४-२.

# बाबांचे दर्शन घेणे महिलांना पडले महागात

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : बागेश्वर धामचे बाबा धिरेंद्र शास्त्री यांच्या दर्शनासाठी झालेल्या गर्दीत दुसऱ्या दिवशीही चोरट्यांनी धुमाकूळ घालत आठ महिलांच्या गळ्यातील दागिने चोरले. पहिल्या दिवशी तब्बल ३६ महिलांच्या गळ्यातील दागिने चोरीला गेले होते.

मीरा रोडच्या श्रीकांत जिचकार चौक (एस.के. स्टोन चौकी) जवळील मैदानात बाबा धिरेंद्र शास्त्री यांच्या दर्शनाचा कार्यक्रम भाजपच्या वतीने शनिवार, १८ मार्च आणि रविवार, १९ मार्च असा आयोजित करण्यात आला होता. शनिवारी पहिल्याच दिवशी बाबांच्या दर्शनाला भाविकांची मोठी गर्दी उसळली. गर्दीचा फायदा घेऊन १८ मार्चला ३६ महिलांच्या गळ्यातील सोनसाखळ्या व मंगळसूत्र असे एकूण ४५० ग्राम वजनाचे चार लाख ८७ हजार किमतीचे दागिने चोरीचा गुन्हा मीरा रोड पोलिसांनी दाखल केला होता. पोलिसांनी सहा महिला चोरांच्या टोळीला अटकही केली होती.

### पोलिसांना न घाबरता हातसफाई

दुसऱ्या दिवशी म्हणजेच रविवारी चोरीचा अनुभव पाहता पोलिस व आयोजक प्रभावी बंदोबस्त आणि व्यवस्था ठेवतील, अशी अपेक्षा होती. मात्र रविवारीही चोरट्यांनी पोलिसांना न घाबरता आपली हातसफाई केली. सोमवारी मीरा रोड पोलिसांनी दाखल केलेल्या गुन्ह्यानुसार आठ महिलांच्या गळ्यातील मंगळसूत्र व सोनसाखळ्या असा एकूण १५० ग्रॅम वजनाचा आणि एक लाख ४३ हजारांचा ऐवज चोरण्यात आल्याचे नमूद केले आहे. दोन दिवसात बाबांच्या दर्शन कार्यक्रमात आलेल्या एकूण ४४ महिला भाविकांचे दागिने चोरीला गेले आहेत.

Scanned with CamScanner

पुण्यनगरी ५.५.७

# अवैध शस्त्र विक्रीसाठी आलेल्या एकास अटक

**मीरा रोड :** नयानगर परिसरात एक जण गुजरात येथून शस्त्रविक्रीसाठी आला असताना पोलिसांनी त्याला अटक केली. त्याच्या विरोधात नयानगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नयानगर पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलिंग करत असताना पोलिसांना ईशा वाइन शॉपजवळ एकजण बेकायदा शस्त्र घेऊन येणार असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार वरिष्ठांना माहिती देऊन इशा वाईन्सजवळ पोलीस पथकाने सापळा लावला. त्यावेळी पोलिसांनी तेथे आलेल्या रोहित शिवा भुतानीला ताब्यात घेत चौकशी केली. सुरत, गुजरात येथून आला असल्याचे त्याने पोलिसांना सांगितले. अंगझडती घेतली असता त्याच्याकडे २० हजार रुपये किमतीचे देशी बनावटीचे पिस्तूल मिळाले. अधिकृत परवाना मागितला असता त्याच्याकडे कोणताही परवाना नसल्याचे तसेच हे पिस्तूल त्याने विक्री करण्यासाठी आणल्याचे सांगितले. पोलिसांनी त्याला अटक केली आहे.

लोकमत ५-५-७

# मीरा रोडमध्ये रिक्षाचालकांच्या लुटीचे सत्र सुरूच

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** मीरा रोडमध्ये रिक्षा चालकास गुंगीचे औषध देऊन दोघांनी लुटल्याचा आणखी एक गुन्हा सोमवारी नया नगर पोलिस ठाण्यात दाखल झाला आहे. त्यामुळे शहरात गुंगीचे औषध देऊन लुटणारी सक्रिय असल्याचे स्पष्ट झाले आहे. बोरिवली पूर्वेच्या काटर रॉड भागात राहणारे राजेंद्र यादव यांनी बोरिवली पश्चिमेस स्वामी विवेकानंद मार्गावरून दोन प्रवाशांचे भाडे घेतले. मीरारोडच्या अय्यप्पा मंदिर येथे दर्शन घेऊन परत यायचे, असे त्या दोघांनी सांगितले. दुपारी मीरारोड येथे आल्यावर मंदिर बंद असल्याचे समजले. एकाने जाऊन दोन फ्रूटी आणल्या आणि रिक्षाचालकासह दुसऱ्या सहकाऱ्यासे दिली. फ्रूटी थोडीशी प्यायले असता बेचव लागली म्हणून यादव यांनी टाकून दिली. मात्र, काही वेळाने त्यांना गुंगी आली आणि त्यांनंतर दोघा प्रवाशांनी यादव यांच्या गळ्यातील १० ग्रॅमची सोन्याची ५० हजार किमतीची चेन लुटून पळ काढला. याप्रकरणी नयानगर येथे गुन्हा दाखल आहे. याआधी बोरिवलीच्या सुनील जाधव रिक्षा चालकास लुटण्यात आले होते.

पुढारी ५-५.२.

# एमपीतील खून, दरोड्याच्या गुन्ह्यातील आरोपीस अटक

**मिरा रोड : पुढारी वृत्तसेवा**

मध्य प्रदेशात (एमपी) दरोडा व खून करून फरार झालेल्या आरोपीला पेल्हार पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकान अटक केली. या आरोपीला पुढील कारवाईकरिता मध्य प्रदेश पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

मध्य प्रदेश राज्यातील सिटी कोतवाली, जिल्हा सतना या पोलीस ठाण्याच्या हद्दीत ६ मार्च २०२३ रोजी भाटीया वाईन ग्रुप कंपनीचे मालक संजयकुमार सिंह हे बँकमध्ये पैसे भरण्यासाठी जात असताना ते बरवाडी रोड, सेंट्रल बँकेचे समोर, सतना, मध्यप्रदेश येथे आले. त्यावेळी अज्ञात आरोपींनी त्यांच्या ताब्यातील १५ लाख रकमेची बॅग जबरीने काढून घेण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी संजय यांनी बॅग देण्यास प्रतिकार केला असता आरोपींनी संजय कुमार सिंह यांच्या पोटावर, पाठीवर व कानाचे जवळ गोळ्या मारून जखमी केले व ते मोटारसायकलवरुन पळून गेले होते. या घडलेल्या घटनेबाबत सिटी कोतवाली पोलीस ठाणे, जिल्हा सतना, मध्य प्रदेश येथे गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्यातील आरोपी निलेश यादव (२२) हा पेल्हार पोलीस ठाणे हद्दीत राहत असल्याची माहिती मध्यप्रदेश पोलिसांना मिळाल्याने त्यांनी पेल्हार पोलिसांना मदत करण्याची मागणी केली होती.

Scanned with CamScanner

लोकमत

# वसईत वाळूची चोरटी वाहतूक बंद, ट्रकसह रेती होते जप्त

## मागील नऊ महिन्यांत २० गुन्हे दाखल : बोटी जाळून पंपही तोडले

मंगेश कराळे
लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : मांडवी पोलिस ठाण्याच्या हद्दीत खानिवडे, कण्हेर, वैतरणा, कसराळी, खर्डी, डोलीव असे रेतीबंदर येतात. या ठिकाणी सध्या अनधिकृत रेतीउपसा बंद असून, शुकशुकाट आहे. तर वाळूची चोरटी वाहतूक केल्यावर पोलिस गुन्हा दाखल करून ट्रकसह रेती जप्त करतात.

मांडवी पोलिसांनी मागील नऊ महिन्यांच्या कालावधीत रेतीचोरांविरुद्ध २० गुन्हे दाखल करून २० ट्रक जप्त करत ३८ आरोपींवर गुन्हे दाखल करून दोषारोप पत्र न्यायालयात पाठविले आहे. चार वाळूमाफियांवर कारवाईही केलेली आहे. मांडवी पोलिसांनी रेतीबंदरांवर कारवाई करून २० ते २२ बोटी जाळल्या, १४ सक्शन पंप तोडले. अंदाजित ४०० ब्रास वाळू जेसीबीच्या साहाय्याने नदीपात्रात ढकलली. समुद्र रस्त्यावर १५ ते २० जणांचे टोळके रात्री १२ ते सकाळी ८ वाजेपर्यंत बिनधास्त रेती चोरी करतात. त्यांच्याविरुद्ध प्रशासन कधी कारवाई करणार, हा



### सर्व जण झोपले की यांना उजाडते

- रेतीबंदरांवर रेतीउपसा बंद आहे. या ठिकाणी पोलिस, महसूल प्रशासन कारवाई करतात. पण, अर्नाळा, कळंब, राजोडी समुद्र किनाऱ्यावर रेतीमाफियांनी बिनधास्त रेती चोरण्यास सुरुवात केली आहे.
- नाव न सांगण्याच्या अटीवर एका गावकऱ्याने सांगितले आहे की, संबंधित बाबतीत पोलिस अधिकारी, महसूल विभाग, तहसीलदार यांच्याशी वेळोवेळी पत्रव्यवहार केला; पण कारवाई मात्र शून्य.

### लिलाव नाही, मग वाळू कोठून येते?

अर्नाळा समुद्रकिनारी काही समाजकंटक रात्री रेती चोरी करून या किनाऱ्याचे वैभव नष्ट करत आहेत. रेतीचोरांची पोलिसांना नावानिशी माहिती असूनही कारवाई करत नाही. तर जे गावकरी घरासाठी रेती नेतात, त्यांच्यावर खोटे गुन्हे दाखल करतात, असा अर्नाळा गावकऱ्यांचा आरोप आहे.

### दोन महिन्यांत वाळूच्या किती वाहनांवर कारवाई?

मागील दोन महिन्यांच्या कालावधीत स्थानिक पोलिस ठाण्यात ५ गुन्हे दाखल करून दोन आरोपींना अटक केली आहे. रेती, हायवा, डंपर असा एकूण १३ लाख ६७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

### महसूल विभाग, पोलिसांना हे दिसत नाही का?

या रेतीचोरांविरुद्ध कारवाई करण्यास पोलिस प्रशासन, तहसीलदार, महसूल विभाग घाबरतात की काय? किंवा या रेतीचोरांना कोणत्या राजकीय पक्षाचे पाठबळ तर नाही ना, अशीही चर्चा ऐकायला मिळते.



Scanned with CamScanner

३४ वर्षांच्या अखंड
पत्रकारितेची परंपरा...

# दैनिक नरवीर चिमाजी

वर्ष : ३५ | अंक : २२७ | गुरुवार दि. २३ मार्च २०२३ | पाने : ४ | किंमत २ रुपये

## वसईतील साईनगर उत्सव समितीच्या भव्य शोभायात्रेने पाडव्याचा आनंद केला द्विगुणित





वसई : वार्ताहर

वसई पश्चिम येथील साईनगर उत्सव समितीतर्फे गुढीपाडव्यानिमित्त शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मोठ्या प्रमाणात ज्येष्ठ नागरिक, युवक, लहान मुले व महिलांचा मोठा सहभाग होता. यावेळी लेझीम, ढोलताशांचा गजर निनादत होता नागरिकांत उत्साह दिसून आला. वसईतील साईनगर उत्सव समितीच्या या भव्य शोभायात्रेने पाडव्याचा आनंद द्विगुणित केला. साईनगर येथून काढण्यात आलेल्या शोभायात्रे पूर्वी वसई विरार महानगर पत्रकार संघाचे अध्यक्ष, तथा कोकण मराठी साहित्य परिषदेचे जिल्हा कार्याध्यक्ष अनिलराज रोकडे, सामाजिक कार्यकर्ते विलास विरजे आणि संजय फौशल यांच्या हस्ते गुढी व पंचांग पूजन करण्यात आले. शोभा यात्रेचा शुभारंभ शिवसेना तालुकाप्रमुख राजाराम बाबर यांच्या हस्ते करण्यात आला. शहरप्रमुख संजय गुरव, जयराम राणे, उपशहरप्रमुख शशिभूषण शर्मा, विश्वनाथ तळेकर, अनिल राणे, शिवाजी शिंदे यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते. साईनगर येथून शोभायात्रेला सुरुवात करण्यात आली. त्यानंतर समता नगर, विद्यामंदिर मार्ग, पंचवटी नाका, अंबाडी मार्ग, अंबाडी रोड, केटी नगर ते शेवटी साईनगर या मार्गावर नागरिकांनी प्रचंड आनंदात सहभाग घेतला. उत्सव समिती व संजय गुरव यांच्या संकल्पनेतून शोभायात्रेत पारंपरिक वेशभूषेत सहभागी झालेल्या महिला व पुरुषांना लकी ड्रॉच्या माध्यमातून बक्षिसे देण्यात आली. यात महिलांसाठी पहिले बक्षीस सोन्याची नथ व दुसरे बक्षीस पैठणी व अन्य आकर्षक बक्षिसे देऊन वाटप करण्यात आली.

## जागतिक जलदिन मात्र पाण्याचा तुटवडा



वसई : वार्ताहर

गावाची शहरे व शहरांची महानगरे होत असताना नवनवी धरणे, बंधारे बांधून लांबून पाणी आणले जाते. स्थानिक परिसरात भुजलाची पातळी खाली खाली जात आहे. पालिका अनेक योजना महानगरासाठी गेली दोन दशके राबवित आहे, तरीही पाणी साठा व पुरवठा अपुरा पडत आहे. वसई-विरारमध्ये जमिनीतील पाण्याचे स्रोत, सिमेंट बांधकामांमुळे पूर्वीपासून असलेले कमी होत आहे. त्यातच आरोग्याला हानिकारक असे ...पान ४ वर

## सात वर्षापासून खुनाच्या गुन्ह्यातील फरार आरोपीला उत्तर प्रदेशातून अटक



मिरा-भाईंदर : वार्ताहर

मीरारोड मध्ये २०१६ साली झालेल्या हत्येतील एका आरोपीला ७ वर्षानंतर उत्तर प्रदेश येथून अटक करण्यात गुन्हे शाखा १ च्या पथकाला यश आले आहे. ...पान ४ वर

## संप, आंदोलनांमध्ये सहभाग नको, अन्यथा...; केंद्र सरकारचा कर्मचाऱ्यांवर कारवाईचा इशारा

वृत्तसंस्था




कोणताही संप किंवा निदर्शनांमध्ये सहभागी होऊ नका, अन्यथा परिणामांना सामोरे जावे लागेल, असा इशारा केंद्र सरकारने आपल्या कर्मचाऱ्यांना दिला आहे. जुनी पेन्शन योजना (ओपीएस) पुन्हा लागू करण्यासाठी संयुक्त मंचाच्या बॅनरखाली 'राष्ट्रीय संयुक्त कृती परिषदे'द्वारे (एनजेसीए) मंगळवारी देशभरात जिल्हास्तरीय रॅली आयोजित करण्याच्या निर्णयानंतर हा इशारा देण्यात आला आहे. कार्मिक आणि प्रशिक्षण विभागाकडून सोमवारी केंद्र सरकारच्या सर्व विभागांच्या सचिवांना यासंबंधीची अधिसूचना जारी करण्यात आली. सरकारी कर्मचाऱ्यांना सामूहिक किरकोळ रजा, निषेध किंवा धरणे आदींसह कोणत्याही प्रकारच्या संपात सहभागी होण्यास किंवा सीसीएस ...पान ४ वर

## इफेड्रीन, मेफेड्रॉन व 'एमडी'चा कारखाना उघडण्याचा डाव ठाणे अमली पदार्थ विरोधी पथकाने केला उद्ध्वस्त!



ठाणे : वार्ताहर

आरोपींना पकडण्यात आले. एमडी पावडरची बाजारात २ लाख ३५ हजार रुपये एवढी किंमत आहे. पोलीसांनी आरोपींच्या विरोधात श्रीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला. आरोपींच्या चौकशीत पोलीस पथकाने मोहम्मद शरीफ अब्दुल हाफिज शेख, उर्फ पापा व आणखीन दोन आरोपींना बेड्या ठोकून एकूण १० लाख ५२ हजार ३८० रुपये किमतीचे १२६.९५ ग्राम एमडी हस्तगत केले आहे. अटक आरोपी कमरूजमान गुलाम मोहम्मद शेख उर्फ कमर (३८) रा. रूम नं. ०५ बसेरा चाळ, ठाणे. हा अमली पदार्थ जवळ बाळगून विपुल लॉज समोरील मुंब्रा पनवेल रोड, दहीसर मोरी गाव, ठाणे येथे फिरत असताना सापळा

## नवऱ्याला सोडून 'लिव्ह इन'मध्ये, पण प्रियकराला तिसऱ्याबद्दल संशय, नात्यांच्या गुंत्याचा थरारक शेवट!





ठाणे : वार्ताहर

ठाण्यातील वागळे इस्टेट परिसरात एका महिलेची हत्या ... धक्कादायक घटना घडली आहे. इतकंच नाही तर या आरोपी प्रियकराने सर्व पुरावेही नष्ट करण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर त्याने स्वतः पोलीस ठाण्यात जाऊन आत्मसमर्पण केलं. या

Scanned with CamScanner

लोकमत



प्रवासादरम्यान गहाळ झालेला लाखोंचा मुद्देमाल दोन तासांमध्ये मिळवून परत देण्याची यशस्वी कामगिरी नायगावच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेने केली.

# गहाळ दागिने, मोबाइल तक्रारदाराला केले परत

## नायगाव गुन्हे प्रकटीकरण शाखेची कामगिरी

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : प्रवासादरम्यान लाखो रुपये किमतीचे गहाळ झालेले सोन्याचे दागिने, दोन मोबाइल तक्रारदाराला दोन तासांमध्ये परत करण्यात नायगावच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पोलिसांना यश मिळाले आहे. हा किमती मुद्देमाल मिळवून दिल्याबद्दल तक्रारदारांनी नायगाव पोलिसांचे आभार मानले आहेत. ही माहिती जनसंपर्क अधिकारी विशाल धायगुडे यांनी मंगळवारी दिली आहे.

नायगावच्या साईधाम कॉम्प्लेक्समध्ये राहणारे मोहन भगवान चाळके व त्यांची पत्नी मनीषा हे दोघे सोमवारी सकाळी नायगाव रेल्वेस्थानकाकडे दुचाकीने जात होते. या प्रवासादरम्यान मनीषा चाळके यांची पर्स व त्यातील ५ तोळे ३ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने व २ मोबाइल असा मुद्देमाल गहाळ झाला. त्यांनी नायगाव पोलिस ठाणे येथे मालमत्ता गहाळ झाल्याची तक्रार दिली. गहाळ झालेल्या मालमत्तेमध्ये किमती मुद्देमाल असल्याने गांभीर्य लक्षात घेऊन नायगाव पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक रमेश भामे यांनी केलेले मार्गदर्शन व सूचनेप्रमाणे गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी सीसीटीव्ही फुटेज व तांत्रिक विश्लेषणाद्वारे माहिती मिळवली. ३ तोळ्याचे सोन्याचे मंगळसूत्र, २ तोळ्याचे नेकलेस, ५ ग्रॅम वजनाची अंगठी असा २ लाख ७५ हजार रुपये किमतीचा ऐवज, मोबाइल असा ३ लाख ५ हजार रुपये किमतीचा गहाळ मुद्देमाल दोन तासांत ताब्यात दिला आहे.

ही कामगिरी पोलिस उपायुक्त सुहास बावचे, सहायक पोलिस आयुक्त पद्मजा बढे यांच्या मार्गदर्शनाखाली नायगाव पोलिस ठाणे वरिष्ठ पोलिस निरीक्षक रमेश भामे, पोलिस निरीक्षक (गुन्हे) मिलिंद सावळे, गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सपोनि संतोष सांगवीकर सपोनि रोशन देवरे, पोलिस अंमलदार सचिन मोहिते, सचिन खताळ, जयवंत खंडवी, अमर पवार, चेतन ठाकरे अशोक पाटील यांनी यशस्वीरीत्या कामगिरी पार पाडली आहे.



Scanned with CamScanner

# शिकायत करने वाले ही पुलिस को गलत समझते हैं कि पुलिस उनका कॉल नहीं उठाती

MHT संवाददाता
राकेश सिंह/नालासोपारा

ऑनलाइन ठगी के मामले काफी बढ़ गए हैं। हालांकि, मौजूदा स्थिति यह है कि पुलिस द्वारा पूछताछ के लिए बुलाए जाने पर कई लोग सामने नहीं आते हैं। ठगी करने वाले फरियादी ही सामने नहीं आ रहे हैं इसलिए आरोपितों की तलाश की जा रही है। ऑनलाइन ठगी के मामले में शिकायत करने के लिए संबंधित को ऑनलाइन सुविधा उपलब्ध कराई गई है। इस शिकायत को दर्ज करने के बाद संबंधित थाने में कक्षाएं लगीं। उसके बाद शिकायत के अनुसार अधिक जानकारी व अन्य सबूतों के लिए थाने से फरियादी को बुलाया जाता है। लेकिन कई मामलों में ऐसा लगता है कि फरियादी यह सोचकर पुलिस का फोन नहीं उठाता कि वह कोई झंझट नहीं चाहता। इसलिए शिकायत करने के लिए सिर्फ नाम ही रह गया है। नतीजतन, धोखाधड़ी के बाद भी मामले की जांच में मुश्किलें पैदा होती हैं।




**696 साइबर सेल को आवेदन :** साइबर सेल को ठगी को लेकर 696 आवेदन मिले हैं। इस आवेदन पर पुलिस स्टेशन ने जांच कर कार्रवाई की है। 4। मामले दर्ज : स्थानीय थाने में साइबर सेल से आवेदन मिलने के बाद जांच व पूछताछ के बाद उसके खिलाफ 4। मामले दर्ज किये गये हैं। सिर्फ 89 आवेदनों की प्रक्रिया पूरी साइबर विभाग में दाखिल आवेदनों में से सिर्फ 89 आवेदनों पर ही कार्रवाई हो सकी है। बाकी अन्य मामलों में शिकायतकर्ताओं ने सहयोग नहीं किया।

**330 आवेदनों का निस्तारण :** 330 आवेदनों का निस्तारण किया जा चुका है। आगे बाकी आवेदन में शिकायतकर्ता से संपर्क करके कार्रवाई की जाएगी।

**ये काम बताकर जाल में फंस जाते... :** बिजली बिल का भुगतान न करने का नाटक करना, एनीडेस्क या अन्य रिमोट एक्सेस ऐप के माध्यम से चीजें खरीदने का लालच देना, ओएलएक्स के माध्यम से लालच देना, ऑनलाइन नौकरी देने का लालच देना, ऑनलाइन गेम या अन्य कार्यों की पेशकश करके धोखा देना, क्रिप्टोकरंसी, ऑनलाइन ऋण में निवेश करने के लिए कहना, उपहार के रूप में भेजना शादी का झांसा देकर अटक जाते हैं

इनाम, पैसे के लालच से बचें: साइबर अपराधी नागरिकों को ऑनलाइन ठगने के लिए तरह-तरह के भेस का इस्तेमाल करते हैं, इनके जाल में फंसने से बचने के लिए सतर्क रहें, इनाम, पैसे के लालच से बचें। ऑनलाइन फ्रॉड या डेटा चोरी, छेड़छाड़ की स्थिति में उन्हें तुरंत साइबर पुलिस स्टेशन से संपर्क करना चाहिए। - साइबर डिवीजन

Scanned with CamScanner

लोकमत

# रिक्षास्टँडजवळून गांजा जप्त

नालासोपारा : विरारमध्ये रिक्षास्टँडजवळ एकाकडून विक्रीसाठी आणलेला गांजा जप्त करण्यात पोलिसांना यश आले आहे. सहकार नगर येथे राहणारा आरोपी अजित अनिल सिंग (२६) याच्या ताब्यात सहकार नगर येथील रिक्षा स्टँडजवळ मंगळवारी संध्याकाळी साडेपाच वाजण्याच्या सुमारास ४५२ ग्रॅम वजनाचा ११ हजार २५० रुपये किमतीचा गांजा विक्रीकरता जवळ बाळगला असताना तो जप्त करण्यात आला आहे. विरार पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

Hello Vasai
Page No. 3 Mar 23, 2023
Powered by: erelego.com

Scanned with CamScanner

लोकमत

# विक्रीसाठीचा गांजा जप्त

नालासोपारा : नालासोपारा पांढरे पाडा येथील एमएच चाळ येथे राहणाऱ्या ओमकार अच्छेलाल गौड (२८) या तरुणाच्या ताब्यात मंगळवारी दुपारी दोनच्या सुमारास भागवत टेकडी, कडव शेठ खदानी जवळ १३० ग्रॅम वजनाचा २३ हजार २५० रुपये किमतीचा गांजा हा अमली पदार्थ जवळ बाळगलेला असताना पोलिसांना आढळून आला होता. पेल्हार पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

Hello Vasai
Page No. 3 Mar 23, 2023
Powered by: erelego.com

Scanned with CamScanner

लोकमत

# तंबाखूजन्य साठा जप्त

नालासोपारा : वसईत मोर्या नाका येथील रामरहिम चाळीसमोर, सातिवली येथे खलीक्कुन्नीसा मुख्तारअली खान या महिलेने तसेच लक्ष्मी इंडस्ट्रियल इस्टेट, वालीव फाटा येथे मुख्तारअली अजीजूल अली याने मंगळवारी रात्री साडेदहाच्या सुमारास नायलॉनच्या वेगवेगळ्या गोण्यांमध्ये भरलेला विविध कंपन्यांचा सुगंधित पानमसाला, जाफरानी जर्दा असा एकूण ६ लाख २० हजार ११६ रुपये किमतीचा तंबाखूजन्य पदार्थाचा साठा असलेला मुद्देमाल विक्रीसाठी जवळ बाळगलेला आढळला. वालीव पोलिसांनी मंगळवारी आरोपी विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

Hello Vasai
Page No. 3 Mar 23, 2023
Powered by: erelego.com

Scanned with CamScanner